जागतिक बँक सहाय्यित "Development of Applied Knowledge and Skills for Human Development" (DAKSH) प्रकल्पासाठी आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

**शासन निर्णय क्र. जाबँप्र-२०२४/प्र.क्र.०२/व्यशि-४**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०६ सप्टेंबर, २०२४.

**संदर्भ:-**

१) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.जाबँप्र-२०२३/प्र.क्र.०६/व्यशि-४, दि.१८/१२/२०२३.

२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय क्र.जाबँप्र-२०२४/प्र.क्र.०२/व्यशि-४, दि.२७/०५/२०२४.

**प्रस्तावना:-**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत जागतिक बँकेच्या सहाय्याने "Development of Applied Knowledge and Skills for Human Development" (DAKSH) प्रकल्प राबविण्यास संदर्भाधीन क्र.१ अन्वये मान्यता दिली आहे. दक्ष प्रकल्पाची किंमत अंदाजित रु.२३०७ कोटी इतकी असून प्रकल्प किंमतीच्या ७०% निधी जागतिक बँकेच्या कर्जाद्वारे व उर्वरित ३०% निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. दक्ष प्रकल्पाचा कालावधी ५ वर्षे आहे. सदर प्रकल्प योजनेस शासन निर्णय दि.२७/०५/२०२४ अन्वये नवीन २ लेखाशीर्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. प्रकल्पाचा निधी आहरित करण्यासाठी **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून **सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई** यांना व **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून **आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई** यांना घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

जागतिक बँकेच्या सहाय्याने "Development of Applied Knowledge and Skills for Human Development" (DAKSH) प्रकल्पासाठी लेखाशीर्ष १) मागणी क्रमांक झेडए-२ २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास ०२, सेवायोजन सेवा ००१, संचालन व प्रशासन (०१) सेवायोजन संचालक (०१) (१७) मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष) प्रकल्प (राज्य हिस्सा ३०%) (कार्यक्रम) (२२३०A८४४) ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर), २) मागणी क्रमांक झेडए-२ २२३०, कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास ०२, सेवायोजन सेवा ००१, संचालन व प्रशासन (०१) सेवायोजन संचालक (०१) (१८) मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास (दक्ष) प्रकल्प (जागतिक बँक

हिस्सा ७०%) (कार्यक्रम) (२२३०A८५३) ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर) मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार मंजूर अनुदानातून निधी वितरणासाठी **"आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून **सहायक संचालक (लेखा), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई** व **"नियंत्रक अधिकारी"** म्हणून **आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई** यांना घोषित करण्यात येत आहे.

०२. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार **"नियंत्रक अधिकारी"** आणि **"आहरण व संवितरण अधिकारी"** घोषित करण्यात येत आहे.

०३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.२१२/२०२४/को.प्र.५, दि.२०/०८/२०२४ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०९०६१२४००७९७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MITHUN MOHANRAO SALUNKHE

Digitally signed by MITHUN MOHANRAO SALUNKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTERPREUNERSHIP AND INNOVATION DEPARTMENT, 2.5.4.20=eb410b645758d07ea6303743e3a96f12f7b5ea5c78305aa3546f1b05a4d188d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=928224E8C07F06F0A63241EEC16360F9961117B3DFDA771ED6746D1433B5EA7A, cn=MITHUN MOHANRAO SALUNKHE
Date: 2024.09.06 12:40:51 +05'30'

**( मिथुन साळुंखे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव,

२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

३) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

४) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

५) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, मुंबई,

७) मा. विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,

८) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

९) मा. उपमुख्यमंत्री (वित्त)/ (गृह) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

१०) मा. मंत्री, कौ.रो.उ. व ना. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१,

१२) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,

१३) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,

१४) निवडनस्ती / व्यशि-४.